# राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या १५ व्या बैठकीचे इतिवृत्त

दि. १७/०३/२०२६

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. २४.०७.२०२५ रोजीच्या १४ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची १४ वी बैठक दि. २४.०७.२०२५ रोजी मा. सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना या कार्यालयाच्या पत्र क्रमांक- वपाविय़ं / प्र.मं.कृ.सिं.यो.२.० / एसएलएनए / ७०३-अ/२०२५, दिनांक ०१/०८/२०२५ अन्वये वितरीत करण्यात आले होते. त्यानुसार बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या पुर्तते संबंधी तपशील **"परिशिष्ट -अ"** नुसार सादर करुन त्यावर विषयनिहाय सविस्तर चर्चा करण्यात आली. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. २४.०७.२०२५ रोजीच्या १४ व्या बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| २ | राज्यस्तरीय तांत्रिक समिती बैठकीतील मंजुरी प्राप्त झालेल्या अमृत सरोवर कामे अवलोकनार्थ सादर. | राज्यस्तरीय तांत्रिक समिती बैठकीतील मंजुरी प्राप्त झालेल्या अमृत सरोवर कामांच्या एकूण ५७ प्रस्तावांना राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत अवलोकनार्थ सादरकरण्यात आले. यापैकी ४५ अमृत सरोवरच्या कामांना सुरुवात झाली असून जालना जिल्ह्यातील एक अमृत सरोवर पूर्ण झाल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीत दिली. | राज्यस्तरीय तांत्रिक समिती बैठकीतील मंजुरी प्राप्त झालेल्या अमृत सरोवर कामांच्या एकूण ५७ प्रस्तावांना समितीने मान्यता दिली.<br>सदरची कामे एप्रिल २०२६ अखेर पूर्ण करण्याबाबत प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांना कळविण्यात यावे असे निर्देश समितीने दिले. तसेच जे जिल्हा जलसंधारण अधिकारी वेळेत कामे पूर्ण करणार नाहीत त्यांची एक वेतनवाढ कायमस्वरूपी थांबविण्यात यावी, असे निर्देश समिती अध्यक्षांनी बैठकी दरम्यान दिले. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| ३ | National | National Hydrology Institute, बेळगाव येथे घेण्यात आलेल्या | National Hydrology Institute, बेळगाव येथे | वसुंधरा |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | Hydrology Institute, बेळगाव येथे घेण्यात आलेल्या Springshed Development बाबत प्रशिक्षण खर्च अवलोकनार्थ सादर. | Springshed Development बाबतच्या प्रशिक्षणासाठी झालेला खर्च समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आला. या प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रत्येक प्रशिक्षणार्थींना एक स्प्रिंग निश्चित करून त्याचा प्राथमिक प्रकल्प अहवाल (PPR) तयार करावा आणि सादर करावा व त्यानंतरच एक मॉडेल प्राथमिक प्रकल्प अहवाल (PPR) तयार करावा. यात Recharge area, जुनी कामे, नवीन घेता येणारी कामे इत्यादींचा समावेश असावा, अशी बैठकीत चर्चा झाली. | घेण्यात आलेल्या Springshed Development प्रशिक्षणासाठी दि. ३०/१०/२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये रक्कम रु. १३,५५,७५०/- एवढया खर्चास समितीने मान्यता दिली. | पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| ४ | ग्रामपरी, MRA, पाचगणी येथे आयोजित Springshed Development प्रशिक्षण खर्च अवलोकनार्थ सादर. | ग्रामपरी, MRA, पाचगणी येथे घेण्यात आलेल्या Springshed Development बाबतच्या प्रशिक्षणासाठी झालेला खर्च समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आला.<br>तसेच Friends Of Moral Re Armament (India), Asian Plateau, Panchgani यांच्या सलग्न असणारी ग्रामपरी या संस्थाकडे झऱ्यांच्या विकासाचे काम करण्यासाठी तांत्रिक ज्ञान (Geology - Hydrology, Aquifer (Mappingअसलेले अनुभवी मनुष्यबळ आहेत . प्रशिक्षणाकरिता सुसज्य Tanning Room, Springs बद्दल सर्व सखोल माहिती या संस्थेकडे आहे .सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र राज्यामध्ये या क्षेत्रात सर्व सोयींनी व ज्ञानाने युक्त अशी हि एकमेव संस्था आहे, अशी बैठकीत चर्चा झाली. | ग्रामपरी, MRA, पाचगणी येथे दि. ०९ ते ११/०१/२०२६ या कालावधीत आयोजित Springshed Development प्रशिक्षणासाठी दि. ०६/०२/२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये रक्कम रु. १०,४८,४३०/- एवढया खर्चास समितीने मान्यता दिली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| ५ | Springshed Development व इतर प्रशिक्षणे | Springshed Development व इतर प्रशिक्षणे ग्रामपरी व MRA संस्था, पाचगणी येथे आयोजित करण्याच्या अनुषंगाने यशदाच्या प्रशिक्षणार्थींची या संस्थेमध्ये ज्या दराने प्रशिक्षणे आयोजित केले | Springshed Development व इतर प्रशिक्षणे ग्रामपरी व MRA संस्था, पाचगणी येथे आयोजित करण्यासाठी या संस्थेशी करण्यात येणाऱ्या सामंजस्य | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | ग्रामपरी व MRA संस्था, पाचगणी येथे आयोजित करणेसाठी सदर संस्थेसोबत सामंजस्य करारनामा (MoU) करण्यास मान्यता मिळणेबाबत. | जातात त्याच दराने प्रशिक्षणे आयोजित करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. तसेच सदरच्या संस्थेसोबत सामंजस्य करारनामा (MOU) करण्याच्या अनुषंगाने मसुदा तयार करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. | करारनामाच्या (MOU) मसुद्याचे प्रारूप वसुंधरा कार्यालयाने तयार करून पुढील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | पुणे आणि ग्रामपरी व MRA संस्था, पाचगणी |
| ६ | Advanced Centre for Water Resources Development And Management (ACWADAM) पुणे संस्थेसोबत Springshed Development संदर्भात प्रशिक्षण देणेकरिता सामंजस्य करारनामा (MoU) | तांत्रिक मार्गदर्शन वेळोवेळी प्राप्त होण्याच्या अनुषंगाने संस्थेसोबत सामंजस्य करारनामा (MOU) करण्यात यावा, अशा विषय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर मांडला. | Springshed Development व इतर प्रशिक्षणे Advanced Center For Water Resources Development And Management (ACWADAM), पुणे येथे आयोजित करण्यासाठी या संस्थेशी करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारनामाच्या (MOU) मसुद्याचे प्रारूप वसुंधरा कार्यालयाने तयार करून पुढील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व ATMA यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | करण्यास मान्यता मिळणेबाबत. | | | |
| ७ | मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांच्या मध्यावधी मूल्यमापन (Mid Term Evaluation) दिनांक- १८/०८/२०२५ झालेला सामंजस्य करार यास मुदतवाढ देणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे या योजनेच्या मध्यावधी मूल्यमापनाच्या कामासाठी यशदा, पुणे या संस्थेस दिनांक २४/०३/२०२५ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या १३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली होती.<br>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व निबंधक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (यशदा) पुणे यांच्यात दिनांक १८/०८/२०२५ रोजी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला होता.<br>वरील सांमजस्य करार (MoU) मधील मुद्या क्र. ०६ नुसार सदर Mid Term Evaluation चे काम १२० दिवसात पूर्ण करणे अपेक्षित होते. हा कालावधी दि. १६/१२/२०२५ रोजी पुर्ण झालेला आहे. दि. २३ जानेवारी २०२६ पासून यशदा मार्फत (Mid Term Evaluation) साठीचा सर्व्हे व इ. कामे सुरु झाली असून सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. त्यामुळे वरील दिनांक १८/०८/२०२५ चे सामंजस्य करारास मुदत वाढ देणेकरीता यशदा यांचे मार्फत दि.१३/०३/२०२६ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार सामंजस्य करारास दिनांक- ३०/०४/२०२५ अखेर मुदत वाढ देणेकरीता चर्चा करण्यात आली. **"सोबत परिशीष्ट-ब"** | दिनांक १७/०३/२०२६ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या १५ व्या बैठकीत, मध्यावधी मूल्यमापन (Mid Term Evaluation) बाबत. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (यशदा) पुणे यांच्या दिनांक १३/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत सामंजस्य करारास मुदतवाढ देण्यांबाबत विनंती केल्यानुसार या बैठकीत मध्यावधी मूल्यमापन पूर्ण करुन अहवाल सादर करणे करिता दि. ३०/०४/२०२६ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (यशदा) पुणे |
| ८ | उपजीविका उपक्रम | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत ३१ प्रकल्पांचे सविस्तर | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना .- पाणलोट | वसुंधरा |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | घटकाअंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) (भाग चौथा) मान्यतेस्तव सादर करणेबाबत. | प्रकल्प अहवाल (भाग - ४) सादर करण्यात आले. यामध्ये उपजीविका, क्षमता बांधणी, उत्पादन पद्धती - वैयक्तिक लाभार्थी तसेच आत्मा यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांचाही समावेश होत. या अहवालातील उपजीविका घटकाअंतर्गत जी तरतूद होती त्यास अनुसरून प्रकल्पनिहाय किती तरतूद होती, किती उपलब्ध झाली आणि तरतुदीपेक्षा कोणत्या प्रकल्पात कमी किंवा अधिक खर्च झाला आहे याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. | विकास घटक २.० अंतर्गत एकूण ३१ प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल - भाग - ४ (उपजीविका, क्षमता बांधणी, प्रवेश प्रेरक उपक्रम तसेच आत्मा यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात आलेल्या उत्पादन पद्धती घटक व वैयक्तिक लाभार्थी घटक) यांना **"सोबत परिशिष्ट क"** अन्वये मान्यता दिली. सादर करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालान्वये उपजीविका घटकाचा ज्या प्रकल्पात १५% पेक्षा जास्त खर्च झाला त्यास देखील समितीने मान्यता दिली. तसेच प्राथमिक प्रकल्प अहवालानुसार उपजीविका घटकाची तरतूद (प्रकल्प मुल्यानुसार) वितरीत केली गेली असून केंद्र शासनाच्या उपजीविका घटकाच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त होण्यापूर्वी महाराष्ट्र राज्यात राज्याने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांच्या सोबत समन्वयाने स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करून त्यानुसार उपजीविका घटकाची अंमलबजावणी केली त्यामुळे त्यानुसार खेळते भांडवल, सामुहिक गुंतवणूक निधी, उपजीविका उपक्रम निधी ज्या प्रकल्पात ज्या टक्केवारीत व MSRLM च्या विहित पद्धतीने वाटप केला आहे त्यास समितीने मान्यता दिली. | पाणलोट विकास यंत्रणा, पुणे तसेच ATMA यंत्रणा, पुणे व MSRLM यंत्रणा, मुंबई |
| ९ | क्षमता बांधणी घटकाअंतर्गत जिल्हा संसाधन | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत क्षमता बांधणी घटकाअंतर्गत जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजीविका संसाधन संस्था (LRA), | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत क्षमता बांधणी घटकाअंतर्गत जिल्हा संसाधन संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | संस्था (DRO), प्रकल्प प्रशिक्षण संस्था (PTO) व उपजीविका संसाधन संस्था (LRA) म्हणून प्रस्ताव सादर केलेल्या परंतु निवड न झालेल्या संस्थांची धनादेशाची रक्कम परत करणेबाबत. | प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी ज्या संस्थांनी प्रस्ताव सादर केले होते सदर प्रस्तावासोबत धनादेशाद्वारे जी रक्कम जमा केली आहे. त्याबावत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. या प्रस्तावांची तपासणी व निवड या प्रक्रियेसाठी Processing Fee च्या स्वरुपात ही रक्कम जमा केली असून धनादेश परत न करण्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली. तसेच वाल्मी संस्थेने प्रस्तावांची छाननी केली असल्यामुळे Processing Fee म्हणून किती रक्कम वाल्मी संस्थेस दयावी याबाबतचा निर्णय वसुंधरा कार्यालयाने घ्यावा तसेच या जमा पैशातूनच ती रक्कम अदा करावी अशी देखील बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | (PTO) व उपजीविका संसाधन संस्था (LRA), प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी ज्या संस्थांनी प्रस्ताव सादर केले होते त्यांनी प्रस्तावासोबत धनादेशाद्वारे जी रक्कम जमा केली ती या प्रस्तावांची तपासणी व निवड या प्रक्रियेसाठी Processing Fee च्या स्वरुपात जमा केली आहे असा निर्णय समितीने दिला. त्यामुळे धनादेश परत न करण्याचे निर्देश समितीने दिले, वाल्मी संस्थेने प्रस्तावांची छाननी केली असल्यामुळे Processing Fee म्हणून किती रक्कम वाल्मी संस्थेस दयावी याबाबतचा निर्णय वसुंधरा कार्यालयाने घ्यावा असे निर्देश समितीने दिले. या जमा पैशातूनच ती रक्कम अदा करावी असेही निर्देश समितीने दिले. **"सोबत परिशिष्ट -ड"**<br>क्षमता बांधणी घटकाअंतर्गत वाल्मी संस्थेस जो निधी वर्ग करण्यात आला आहे ,त्याअनुषंगाने वसुंधरा कार्यालयाच्या लेखाशाखेमार्फत वाल्मी संस्थेची लेखे तपासणी केली असता दि.०६/०२/२०२६ रोजीच्या पत्रानुसार वाल्मी संस्थेने रक्कम रु. ५२,३४,६४९/- इतकी वितरीत निधीमधून अग्रिम प्रवासभत्ता व इतर खर्च यासाठी तसेच मिटिंग व दौरे यासाठी रक्कम रु. १,१६,०९१/- इतकी रक्कम वर्ग केली असल्याचे दिसून आले परंतु ह्या सर्व बाबींचा प्रत्यक्ष ताळमेळ घालून वाल्मी संस्थेस या | पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | | Processing Fee च्या स्वरुपात जमा रकमेतून ती रक्कम अदा करावी असेही निर्देश समितीने दिले.<br>ज्या बँक खात्यावर ही रक्कम जमा करण्यात आली आहे त्यास देखील समितीने मान्यता दिली. | |
| १० | उत्पादन पद्धती घटकाअंतर्गत आत्मा यंत्रणेस वर्ग करण्यात आलेल्या प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती हे घटक राबविण्यासाठी वर्ग करण्यात आलेला निधी वैयक्तिक लाभ देणेसाठी खर्च करण्यास मान्यता मिळणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रेरक प्रवेश उपक्रम व उत्पादन पद्धती घटकांसाठी अंदाजित एकूण रक्कम रु. १०.०१ कोटी एवढा निधी शिल्लक असल्याचे आत्मा यंत्रणेमार्फत कळविण्यात आलेले आहे.<br>त्यानुसार प्रकल्प संचालक, आत्मा व प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी समन्वयाने प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध शिल्लक निधीचा आढावा घेऊन, प्रत्यक्षात शिल्लक राहणाऱ्या रकमेच्या आधारे प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांतील शिल्लक निधी उत्पादन पद्धती - वैयक्तिक लाभार्थी करिता वर्ग करण्याचे नियोजन करून सदर शिल्लक निधी आत्मा यंत्रणेमार्फत उत्पादन पद्धती - वैयक्तिक लाभ देणेसाठी खर्च करणेबाबत चर्चा करण्यात आली.<br>शिवाय केंद्र शासनाच्या दि.०९/०३/२०२६ रोजीच्या प्राप्त पत्रानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० प्रकल्पास एक वर्ष मुदतवाढ मिळाली असून आत्मा यंत्रणेस त्यांना वर्ग करण्यात आलेला व त्यांनी खर्चाचे जे नियोजन सादर केले आहे त्या अनुषंगाने नियोजनानुसार लवकरात लवकर खर्च करण्याबाबत कृषी संचालक (आत्मा) यांना कळविणेबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. | जिल्हा प्रकल्प संचालक, आत्मा व प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी समन्वयाने प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध शिल्लक निधीचा आढावा घेऊन, प्रत्यक्षात शिल्लक राहणाऱ्या रकमेच्या आधारे प्रवेश प्रेरक उपक्रम व उत्पादन पद्धती या घटकांतील शिल्लक निधी उत्पादन पद्धती - वैयक्तिक लाभार्थी करिता वर्ग करण्याचे नियोजन करून सदर शिल्लक निधी आत्मा यंत्रणेमार्फत उत्पादन पद्धती - वैयक्तिक लाभ देणेसाठी खर्च करणे आवश्यक आहे.<br>वैयक्तिक लाभ आत्मा यंत्रणेकडील उपलब्ध निधीमधून प्रदान करताना वसुंधरा कार्यालयामार्फत उत्पादन पद्धती घटकाअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी यांना लाभ देण्यासाठी ज्या मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना समितीने दिल्या.<br>शिवाय केंद्र शासनाच्या दि.०९/०३/२०२६ रोजीच्या प्राप्त पत्रानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० प्रकल्पास एक वर्ष मुदतवाढ मिळाली असून आत्मा यंत्रणेस त्यांना वर्ग | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व कृषी संचालक (आत्मा), जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा प्रकल्प संचालक (आत्मा) |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय</th><th>बैठकीतील चर्चा</th><th>बैठकीतील निर्णय</th><th>अंमलबजावणी यंत्रणा</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>करण्यात आलेला व त्यांनी खर्चाचे जे नियोजन सादर केले आहे त्या अनुषंगाने नियोजनानुसार लवकरात लवकर खर्च करण्याबाबत कृषी संचालक (आत्मा) यांना कळविण्याचे निर्देश समितीने दिले.</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयिन यंत्रणा (PIA) म्हणून निवड करण्यात आलेल्या अशासकीय संस्था (NGO"s) ची यादी अवलोकनार्थ सादर करणेबाबत.</td><td>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) म्हणून काम करण्यासाठी ४ स्वयंसेवी संस्थांची निवड अध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांच्यामार्फत करण्यात आली होती. सदर प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) यांच्या यादीस दि.२४/०३/२०२४ रोजीच्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सद्यस्थितीत धाराशिव जिल्ह्यातील प्रकल्प क्र. ३ साठी निवड केलेल्या संस्थेची निवड रद्द करण्यात आलेली आहे.<br>तसेच अध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांचेमार्फत परभणी जिह्यातील प्रकल्प क्र. ३, रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्प क्र. ५ व ७ तसेच हिंगोली जिल्ह्यात प्रकल्प क्र. १ साठी अशा एकूण ४ स्वयंसेवी संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत, पूर्वी निवडण्यात आलेल्या ३ स्वयंसेवी संस्था व त्यानंतर निवड करण्यात आलेल्या ४ स्वयंसेवी संस्था अशा एकूण ७ स्वयंसेवी संस्थाची यादी अवलोकनार्थ समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आली.</td><td>प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) म्हणून काम करणेसाठी अध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांच्यामार्फत निवड करण्यात आलेल्या एकूण ७ स्वयंसेवी संस्थांना समितीकडून मान्यता देण्यात आली. संस्थांची यादी खालीलप्रमाणे -<br><br>प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा (PIA) LIST<br><table><tr><th>Sr. No.</th><th>DISTRICT</th><th>PROJECT NAME</th><th>PIA NAME</th></tr><tr><td>१</td><td>नाशिक</td><td>NASHIK-WDC - २</td><td>मंद्राई संस्था, धुळे</td></tr><tr><td>२</td><td>धाराशिव</td><td>DHARASHIV-WDC - २</td><td>श्री. निलकंठेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जि.</td></tr></table></td><td>वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे संभाजीनगर</td></tr>
</table>

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | | | | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | परभणी | |
| | | | ३ | परभणी | PARBHANI -WDC - १ | श्री. नीलकंठेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, परभणी. | |
| | | | ४ | | PARBHANI -WDC - ३ | सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वसमत जि. हिंगोली | |
| | | | ५ | रत्नागिरी | RATNAGIRI-WDC - ५ | राष्ट्रीय युवा स्वयंरोजगार संस्था, रत्नागिरी | |
| | | | ६ | | RATNAGIRI-WDC - ७ | कृषी सेवा संघ विसापूर, अहिल्यानगर | |
| | | | ७ | हिंगोली | HINGOLI-WDC - १ | श्री. निलकंठेश्वर बहुउद्देशीय | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | | सेवाभावी संस्था जि. परभणी<br>SLNA ने याची नोंद घेतली आहे. | |
| १२ | आर्थिक वर्ष सन २०२६-२७ च्या वार्षिक कृति आराखड्यास (Annual Action Plan) मान्यता मिळणेबाबत. | आर्थिक वर्ष सन २०२६-२७ चा वार्षिक कृति आराखडा (Annual Action Plan) मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. त्याबाबत **"परिशीष्ट- ई"** अवलोकनार्थ सादर करण्यात आले होते. | आर्थिक वर्ष सन २०२६-२७ च्या वार्षिक कृति आराखड्यास (Annual Action Plan) मान्यता देण्यात आली. **"सोबत परिशीष्ट- ई"** | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| १३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची बैठक व्यवस्था, फर्निचर, विद्युत, रंगरंगोटी, फरशी व अनुषंगिक नुतनीकरणास मान्यता मिळणेबाबत. | मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांच्या कार्यालयातील फर्निचर, बैठक व्यवस्था, विद्युत दुरुस्ती, रंगरंगोटी तसेच अभिलेख साठवणुकीसाठी आवश्यक अशा अन्य अनुषंगिक बाबींबाबत सध्या अत्यंत अपुरी व असुविधाजनक स्थिती असल्याने, अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी बसण्याकरिता योग्य बैठक व्यवस्था उपलब्ध नसल्याने व अभिलेख साठवणुकीसाठी स्वतंत्र कक्षाचे नूतनीकरण करणे आवश्यक असल्याने कार्यालयाच्या कामकाजास पूरक ठरतील अशा सुधारणा तातडीने करणे गरजेचे होते. त्या दृष्टीने SPC Flooring, Unplasticized Polyvinyl chloride (uPVC), Side runer, Table, Chairs, Sofa, Acoustic Ceiling, Roller blind, Storage, Electrification and lighting repair या बाबींच्या कामकाजाकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, पुणे-४११००१ | मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-४११००१ व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, पुणे-४११००१ यांच्याकडून या कार्यालयाच्या करावयाच्या नूतनीकरणाच्या कामास प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये- ८७,०८,७३३/- व रक्कम रुपये- ३०,५३,८५७/- चा खर्च प्रशासकीय निधीतून करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर कामकाजासाठी स्पर्श प्रणालीवरुन मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, पुणे - ४११००१ यांच्याकडून रक्कम रुपये- ३०,५३,८५७/- अशा प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय किमंतीनुसार कार्यालयाचे नूतनीकरणाचे कामकाज करुन घेणेसाठी व स्पर्श प्रणालीवरुन वर्ग करण्यात आलेल्या अनक्रमे रक्कम | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-४११००१ व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय</th><th>बैठकीतील चर्चा</th><th>बैठकीतील निर्णय</th><th>अंमलबजावणी यंत्रणा</th></tr>
<tr><td></td><td></td><td>वेगवेगळ्या स्वरुपानुसार या कार्यालयाच्या प्रशासकीय मान्यतेच्या अधिकाराच्या अधीन राहून दहा लाख रुपयांच्या मर्यादेत अंदाजपत्रके मागणी करण्यात आली होती.<br>त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार कॉलम क्रमांक-२ व ३ नुसार कार्यकारी अभियंता, पुणे यांचेकडून अंदाजपत्रके प्राप्त करुन घेऊन कॉलम क्रमांक- ४ मधील कार्यालयीन आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कामाचे नांव</th><th>अंदाजपत्रकीय किंमत सर्व करांसहित</th><th>प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक व दिनांक</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td></tr>
<tr><td colspan="4">सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-४११००१</td></tr>
<tr><td>१.</td><td>एसपीसी व पीव्हीसी फ्लोरींग बसविणे</td><td>८,०३,३४७/-</td><td>वपावियं/कार्यालय दुरुस्ती/५८/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६</td></tr>
<tr><td>२.</td><td>व्हिनीअर डोअर, सोफा, व्हिनीअर फॉल्स सिलींग व इतर अनुषंगिक कामे करणे.</td><td>९,८६,०८४/-</td><td>वपावियं/कार्यालय दुरुस्ती/५९/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६</td></tr>
<tr><td>३.</td><td>व्हिनीअर टेबल, साईड</td><td>९,९९,४११/-</td><td>वपावियं/कार्यालय दुरुस्ती/६०/ २०२६,</td></tr>
</table></td><td>रुपये- ८७,०८,७३३/- व ३०,५३,८५७/- या निधीलाही मान्यता देण्यात आली.</td><td>विभाग, पुणे-४११००१</td></tr>
</table>

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | रनर, कॉन्फरन्स टेबल, स्टोरेज व इतर अनुषंगिक कामे करणे. | | दिनांक- २२/०१/२०२६ |
| ४. | स्वच्छतागृहांची कामे, पार्टीशन, जिप्सम प्लास्टर व इतर अनुषंगिक कामे करणे. | ९,३८,७६४/- | वपावियं/कार्यालय दुरुस्ती/६१/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| ५. | युपीव्हीसी खिडक्या, व्हिनीअर सीलींग एसपीसी फ्लोरींग, रोलर ब्लाईड बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ९,९९,६४६/- | वपावियं/कार्यालय दुरुस्ती/६२/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | ऑफिसर टेबल, पॅनलिंग, रंगकाम, खुर्च्या दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे करणे. | ९,९९,८९८/- | वपाविंय/कार्यालय दुरुस्ती/६३/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| ७. | स्टाफ स्टोरेज, ग्लास, खुर्च्या व इतर अनुषंगिक कामे करणे. | ९,९३,५२७/- | वपाविंय/कार्यालय दुरुस्ती/६४/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| ८. | स्टाफ टेबल, टेबल साईड रनर, स्टोरेज व इतर अनुषंगिक कामे करणे. | ९,९७,१८९/- | वपाविंय/कार्यालय दुरुस्ती/६५/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| ९. | लो हाईट स्टोरेज, फॉल सिलींग बसविणे, साईन बोर्ड बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ९,९०,८६७/- | वपाविंय/कार्यालय दुरुस्ती/६६/ २०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| | एकूण रक्कम | ८७,०८,७३३ | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | (see table below) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | रुपये | /- | |
| सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, पुणे-४११००१ | | | |
| १ | Providing Electrical Installation बसविणे | ७,४९,७६६/- | वपावियं/कार्यालय दुरुस्ती/५३/२०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| २ | Providing LAN, Telephone and UPS System बसविणे | ९,०८,५८८/- | वपावियं/कार्यालय दुरुस्ती/५४/२०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| ३ | Providing Split and Cassette Type AC बसविणे | ३,९५,९०१/- | वपावियं/कार्यालय दुरुस्ती/५५/२०२६ दिनांक- २२/०१/२०२६ |
| ४ | Providing Video Conference System बसविणे | ९,९९,६०२/- | वपावियं/कार्यालय दुरुस्ती/५५-अ/२०२६, दिनांक- २२/०१/२०२६ |
| | **एकूण रक्कम रुपये** | **३०,५३,८५७/-** | |

वरीलप्रमाणे मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-४११००१ यांच्याकडून रक्कम रुपये- ८७,०८,७३३/- व

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, पुणे-४११००१ यांच्याकडून रक्कम रुपये- ३०,५३,८५७/- अशा प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय किमंतीनुसार कार्यालयाचे नूतनीकरणाचे कामकाज करुन घेणेसाठी व स्पर्श प्रणालीवरुन त्यांना वर्ग करण्यात आलेल्या अनक्रमे रक्कम रुपये- ८७,०८,७३३/- व ३०,५३,८५७/- यांस मान्यता देणेबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. | | |
| १४ | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या अंमलबजावणी व प्रस्तावित प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक ३.० चे प्राथमिक प्रकल्प अहवाल (पी.पी.आर.) तयार करण्याच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक- १० व ११ सप्टेंबर, २०२५ | कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांचेकडील पत्र क्रमांक- केंपुयो-२०२५/प्र.क्र.७९/e-११२२३७३/जल-८, दिनांक- २८/०८/२०२५ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० योजनेच्या अंमलबजावणीबाबत व प्रस्तावित प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक ३.० चे प्राथमिक प्रकल्प अहवाल (PPR) तयार करण्याच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक- १० व ११ सप्टेंबर, २०२५ रोजी पुणे येथे कार्यशाळा आयोजित करणेबाबत मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिलेले होते.<br>या कार्यशाळेसाठी मान्यवरांसाठी व अधिकाऱ्यांसाठी निवासाची सोय करण्यासाठी उच्च प्रतीचे निवासी हॉटेल, लॅन सेवा व कार्यशाळेचे ठिकाण निश्चित करण्यासाठी मा.सचिव महोदय यांच्या चर्चेअंती व सुचनेनुसार दिनांक- २२/०८/२०२५ अन्वये दरपत्रके मागविण्यात आली होती. दरपत्रकाच्या कार्यवाहीस कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांचेकडील पत्र क्रमांक- केंपुयो-२०२५/प्र.क्र.११६/e-१२६७८३८/जल-८, दिनांक- ०३ सप्टेंबर, २०२५ च्या पत्रान्वये तातडीची बाब म्हणून रु.२० लक्ष पर्यंतचा खर्च दरपत्रकाद्वारे करण्यास | कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांचेकडील पत्र क्रमांक- केंपुयो-२०२५/प्र.क्र.११६/e-१२६७८३८/ जल-८, दिनांक- ०३ सप्टेंबर, २०२५ नुसार दिनांक- १० व ११ सप्टेंबर, २०२५ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेच्या एकूण खर्च रक्कम रुपये- २१,२६,१२५/- यांस मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | शासनाकडून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच कार्यशाळेसाठी येणारा खर्च प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या निधीतून करण्यात येणार असल्याने सदर खर्चास राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (SLNA) ची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी असे सूचित करण्यात आले होते. दिनांक-२९/०८/२०२५ अखेर प्राप्त दरपत्रकाच्या आधारे एल-१ म्हणून प्राईड हॉटेल, ५, युनिव्हरर्सिटी रोड, नरवीर तानाजीवाडी, शिवाजीनगर, पुणे-४११००५ या हॉटेलची निवड करण्यात आली होती. या कार्यालयाच्या आदेश क्रमांक- वपाविय़ं/प्रशा/मृजसं/कार्यशाळा/ ७९६, दिनांक-२९/०८/२०२५ अन्वये त्यांना कार्यालयीन आदेशही निर्गमित करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी पदाधिकारी व अधिकारी यासह सुमारे १५० व्यक्ती उपस्थित होत्या.<br>या कार्यशाळेस झालेला एकूण खर्च पुढीलप्रमाणे- | | |

| अ.क्र. | तपशिल | कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक | एकूण खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | प्राईड हॉटेल, शिवाजीनगर, पुणे | वपाविय़ं/प्रशा/मृ.ज.वि.कार्यशाळा/ ७९८/२०२५, दि.३/९/२५ व वपाविय़ं/प्रशा/मृ.ज.वि.कार्यशाळा/८७५/२०२५, दि.१/१०/२५ | १७,८४,५१४/- | कार्यशाळेसाठी उच्च प्रतीचे निवासी हॉटेल व लॅन व्यवस्था इ. साठी दरपत्रकाद्वारे खर्च केला आहे. |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | (nested table below) | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | सजावट, साऊंड सिस्टीम, माईक, स्टॅन्डी, LED, व्ही.डी.ओ.-फोटोग्राफी | वपावियं/प्रशा/मृ.ज .वि.कार्यशाळा/११ २५/२०२५, दि.११/१२/२५ | ३,०४,५३४/- | कार्यशाळेसाठी सजावट, साऊंड सिस्टीम, माईक, स्टॅन्डी, LED, व्ही.डी.ओ.-फोटोग्राफी व्यवस्था इ. साठी दरपत्रकाद्वारे खर्च केला आहे. |
| ३. | तज्ञ मार्गदर्शक मानधन देयक | वपावियं/प्रशा/मृ.ज .वि.कार्यशाळा/११ ३०/२०२५, दि.१५/१२/२५ | २५,०००/- | कार्यशाळेसाठी रुपये-५,०००/- प्रमाणे ५ व्यक्तींना |
| ४. | फ्लेक्स डिझायनींग | वपावियं/प्रशा/मृ.ज .वि.कार्यशाळा/११ ९३/२०२५, दि.३१/०१/२५ | ३,०६८/- | कार्यशाळेसाठी |
| ५. | ओळखपत्र | वपावियं/प्रशा/मृ.ज .वि.कार्यशाळा/११ ९३/२०२५, दि.३१/०१/२५ | ४,०१२/- | कार्यशाळेसाठी |
| ६. | ओळखपत्र लेस | वपावियं/प्रशा/मृ.ज .वि.कार्यशाळा/११ ९३/२०२५, दि.३१/०१/२५ | ४,९९७/- | कार्यशाळेसाठी |
| | एकूण खर्च रुपये | | २१,२६,१२५/ | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | (continuation of inner table row: – )<br><br>वरीलप्रमाणे अनुक्रमे दिनांक- १० व ११ सप्टेंबर, २०२५ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेच्या करण्यात आलेल्या एकूण खर्च रक्कम रुपये- २१,२६,१२५/- यांस कार्योत्तर मान्यता मिळण्यास विनंती करण्यात आली होती. | | |
| १५ | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या अंमलबजावणीसाठी G.I.S. कक्षामध्ये प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग स्तरावर प्रत्येकी एक याप्रमाणे ६ भौगालिक माहिती प्रणाली सहयोगी (Geographic Information System | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना घटक २.० ही योजना वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे मार्फत मृद व जलसंधारण विभागामध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत पाणलोट क्षेत्राची भौगोलिक माहिती अद्ययावत करण्याकरिता संगणक प्रणालीचा वापर करून पाणलोट नकाशे तयार करणे, Geotagging करणे, तसेच भौगालिक माहिती प्रणाली (GIS) संबंधित माहिती संकलनाचे कार्य सध्या सुरु आहे.<br><br>महाराष्ट्र राज्यातील ३४ जिल्ह्यांचे पाणलोटांचे बृहत आराखडे तयार करण्यासाठी व भौगालिक माहिती प्रणाली (GIS) कक्ष बळकटीकरणाच्या दृष्टीने मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांची दि. १० व ११ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे येथे झालेल्या कार्यशाळेत मा. सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी आवश्यक सूचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे येथील भौगालिक माहिती प्रणाली (GIS) कक्षाअंतर्गत मृद व जलसंधारण विभागाच्या ६ प्रादेशिक विभागांमध्ये प्रत्येकी एक अशा एकूण ६ GIS कक्षांसाठी ६ संगणक (Workstation) खरेदी करण्यात आले आहेत.<br><br>तसेच मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीत मा. सचिव महोदय | सर्व प्रादेशिक विभागांमध्ये प्रत्येकी एक भौगालिक माहिती प्रणाली (GIS) कक्ष स्थापन करून प्रत्येकी एक भौगालिक माहिती प्रणाली सहयोगी (GIS Associate) अशी एकूण ६ पदे कंत्राटी पद्धतीने त्रयस्थ संस्थेमार्फत पूर्वलक्षीप्रभावाने भरण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे व विशाल एक्सपर्ट सर्व्हिसेस इंडिया लिमिटेड, पुणे. |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | Associate) केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | यांनी दिलेल्या निर्देशानुसार मृद व जलसंधारण विभागाच्या ६ प्रादेशिक विभागांमध्ये प्रत्येकी एक भौगालिक माहिती प्रणाली (GIS) कक्ष स्थापन करून प्रत्येकी एक भौगालिक माहिती प्रणाली सहयोगी (GIS Associate) अशी ६ पदे कंत्राटी पद्धतीने त्रयस्थ संस्थेमार्फत या कार्यालयीन स्तरावरुन भरण्यात आली आहेत.<br>सर्व प्रादेशिक विभागांमध्ये प्रत्येकी एक भौगालिक माहिती प्रणाली (GIS) कक्ष स्थापन करून प्रत्येकी एक भौगालिक माहिती प्रणाली सहयोगी (GIS Associate) अशी एकूण ६ पदे कंत्राटी पद्धतीने त्रयस्थ संस्थेमार्फत पूर्वलक्षीप्रभावाने भरण्यास कार्योत्तर मान्यता मिळण्यास विनंती करण्यात आली होती. | | |
| १६ | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक ३.० अंतर्गत प्राथमिक प्रकल्प अहवाल तसेच त्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरुपातील सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार | केंद्र शासनाच्या प्राप्त निर्देशानुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक ३.० या योजनेच्या अंमलबजावणीबाबत तात्पुरते प्राथमिक प्रकल्प अहवाल (Draft PPR) व तात्पुरते सविस्तर प्रकल्प अहवाल (Draft DPR) तयार करण्यासाठी Flexi Fund या घटकामधून खर्च करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या अनुषंगाने आवश्यक ते अंमलबजावणी यंत्रणांचे प्रशिक्षण घेण्यासाठी कार्यशाळा, प्रशिक्षणे आयोजित करण्याबाबत देखील बैठकीत चर्चा झाली. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक ३.० या योजने अंतर्गत प्रकल्पांचे तात्पुरते प्राथमिक प्रकल्प अहवाल (Draft PPR) व तात्पुरते सविस्तर प्रकल्प अहवाल (Draft DPR) तयार करण्यासाठी आवश्यक निधी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या तयार करण्यात आलेल्या Flexi Fund या घटकामधून खर्च करण्यास समितीने मान्यता दिली.<br>त्याचबरोबर यासाठी केंद्रशासनाने पत्रात नमूद केल्यानुसार महाराष्ट्र राज्यासाठी जे प्रकल्प क्षेत्र दिले आहे. त्यानुसार प्रकल्पांची निश्चिती करून त्या अनुषंगाने अंमलबजावणी यंत्रणांना आवश्यक ते प्रशिक्षण, राज्य स्तरावर आवश्यक त्या कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश समितीने दिले. याबाबतचा | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे. |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपलब्ध असणाऱ्या Flexi Fund या निधीमधून तयार करणेसाठी खर्चास मान्यता मिळणेबाबत. | | खर्च वाल्मी संस्था, छत्रपती संभाजीनगर या संस्थेस क्षमता बांधणी अंतर्गत जो निधी वर्ग केला आहे आणि त्या निधीच्या शिल्लक रकमेतून करण्याचे निर्देश समितीने दिले. जर या कार्यशाळा, प्रशिक्षणे वाल्मी संस्थेच्या बाहेर आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात आली तर त्याची देयके वाल्मी संस्थेकडील क्षमता बांधणी घटकाच्या शिल्लक निधीतून प्रदान करण्यास समितीने मान्यता दिली. | |
| १७ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत सोलापूर जिल्हामध्ये २०० हेक्टर क्षेत्रावर काटेविरहीत निवडूंग लागवड करणेबाबत EOI - Expression of interest प्रसिद्ध करणेबाबत. | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत सोलापूर जिल्हात काटेविरहीत निवडुंग लागवड करण्यासाठी Expression of interest (EOI) द्वारे प्रस्ताव मागविण्यात येणारे प्रस्ताव खालीलप्रमाणे -<br>१. Expression of Interest for the Supply of Planting Material of Spineless Cactus through Tissue Culture - वसुंधरा, पुणे कार्यालयाकडून टिश्यू कल्चर (Tissue culture) पद्धतीने काटेविरहीत निवडुंग लागवडीसाठी लागवड साहित्य (Planting Material) पुरवू शकणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. **(सोबत परिशिष्ट - ग)**<br>२. वसुंधरा, पुणे कार्यालयाद्वारे काटेविरहीत निवडुंग लागवड क्षेत्रातील योग्य प्रशिक्षण व अनुभव असलेल्या, तसेच कृषी विस्तार कार्यामध्ये कामाचा अनुभव असलेल्या संस्था/प्रतिष्ठित संस्था/कृषी विद्यापीठांकडून प्रस्ताव | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत सोलापूर जिल्हात काटेविरहीत निवडुंग लागवड करण्यासाठी मुद्दा क्र. १ ला **"परिशिष्ट - ग"** नुसार, तसेच मुद्दा क्र. २ ला ला **"परिशिष्ट - ह"** नुसार व मुद्दा क्र. ३ ला **"परिशिष्ट - इ"** नुसार Expression of interest (EOI) द्वारे मागविण्यात येणाऱ्या प्रस्तावांना सादर परिशिष्ट निहाय मान्यता देण्यात आली.<br>तसेच मराठवाडा, विदर्भ या भागांतही मोठ्या प्रमाणात सलग शेती अयोग्य जमीन उपलब्ध झाल्यास तेथेही काटे विरहीत निवडुंग लागवडीचा विचार करणेत यावा असे निर्देश समितीने दिले.<br>राज्य मान्यता समितीच्या मान्यतेसाठी या प्रस्तावांची शिफारस समितीने केली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे. |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | मागविण्यात येत आहेत. संबंधित संस्थेकडे सोलापूर जिल्ह्यात २०० हेक्टर जमीन उपलब्ध असणे आवश्यक आहे.<br>**(सोबत परिशिष्ट - ह)**<br>३. Forward Linkage - काटेविरहीत निवडुंग - बायो/व्हेगन लेदर उत्पादनासाठी प्रोत्साहन व विस्तारासाठी खालील प्रकारच्या संस्था या योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्यास पात्र असतील - **(सोबत परिशिष्ट - इ)**<br>• संयुक्त उपक्रम (Joint Venture) / Consortium<br>• सार्वजनिक मर्यादित कंपन्या (Public Limited Companies)<br>• खाजगी क्षेत्रातील कंपन्या (Private Sector Companies)<br>• मर्यादित दायित्व भागीदारी (Limited Liability Partnership - LLP)<br>• भागीदारी संस्था (Partnership Firm)<br>• मालकी हक्क संस्था (Proprietorship Firm)<br>उपरोक्त नुसार मुद्दा क्र. १, २ व ३ साठी Expression of interest (EOI) द्वारे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. तसेच सोलापूर जिल्ह्यात २०० हेक्टर क्षेत्रावर काटेविरहीत निवडुंग लागवड करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणेचे प्रस्तावित असून त्यासाठी इच्छुक व पात्र स्वयंसेवी संस्था, कृषी विद्यापीठे आणि खाजगी संस्था यांच्याकडून प्रस्ताव मागविणेत येत असून याबाबतचा सविस्तर तपशील परिशिष्टनिहाय सदर करण्यात आला व त्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी श्री. वायाळ यांनी मराठवाडा भागात देखील सोलापूर जिल्ह्यात काटेविरहीत निवडुंग लागवडीचा पथदर्शी प्रकल्प तयार करण्यासाठी | | |

| अ. क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| | | प्रयत्न केले जात आहेत तसाच पथदर्शी प्रकल्प तयार करणेत यावा अशी मागणी केली. | | |
| १८ | ऐनवेळचे विषय | | | |
| | १ वसुंधरा कार्यालयातील नियमित पदे (उप मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी इ.) भरणेबाबत | १ नियमित पदे भरताना सुधारित आकृतिबंध तयार करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. | १ प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना - पाणलोट विकास घटक - ३.० अंतर्गत राज्यस्तर, जिल्हास्तर व प्रकल्पस्तरावरील नियमित व कंत्राटी पदांबाबतचा सविस्तर अभ्यास करून सुधारित आकृतीबंध तयार करून त्यास मान्यतेसाठी पुढील राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. | १ वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |

(कमलाकर रणदिवे)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११००१.

(कमलाकर रणदिवे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११००१.

(गणेश पाटील)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
सचिव, मृद व जल संधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई